**भारताच्या पंतप्रधानांनी भूतानला दिलेल्या औपचारिक भेटीवर संयुक्त प्रसिद्धीपत्रक (11-12 नोव्हेंबर 2025)**

12 नोव्हेंबर 2025

भूतानचे राजा महामहिम जिग्मे खेसर नामग्याल वांगचूक यांच्या निमंत्रणावर, भारताचे माननीय पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी 11-12 नोव्हेंबर 2025 दरम्यान भूतानच्या दोन दिवसीय औपचारिक भेटीवर होते.

2. या भेटीदरम्यान, पंतप्रधान मोदी 11 नोव्हेंबर 2025 रोजी चांगलीमिथंग मध्ये महामहिम चौथे ड्रुक ग्याल्पोच्या 70व्या वाढदिवसानिमित्त भूतानच्या नागरिकांमध्ये मुख्य अतिथी म्हणून सहभागी झाले. थिम्फू येथे सुरू असलेल्या जागतिक शांतता प्रार्थना महोत्सवातही पंतप्रधान मोदी यांनी भाग घेतला. या महोत्सवादरम्यान सार्वजनिक दर्शनासाठी भगवान बुद्धांचे पवित्र पिप्रहवा अवशेष भारतातून थिम्फूमध्ये आणून प्रदर्शित करण्यात आल्याबद्दल महामहिम भूतानच्या राजांनी प्रशंसा केली.

3. पंतप्रधान मोदी यांनी महामहिम राजा आणि महामहिम चौथे ड्रुक ग्याल्पो यांची औपचारिक भेट घेतली आणि भूतानच्या पंतप्रधान दाशो शेरिंग तोबगे यांच्याशी संवाद साधला. द्विपक्षीय सहकार्य आणि परस्पर हिताच्या प्रादेशिक आणि जागतिक मुद्यांवर नेत्यांमध्ये चर्चा झाली.

4. महामहिम राजा यांनी 10 नोव्हेंबर रोजी दिल्लीमध्ये झालेल्या स्फोटात मौल्यवान जीवितहानीच्या दुःखद घटनेबद्दल भूतान सरकार आणि भूतानमधील जनतेतर्फे मनापासून शोक व्यक्त केला तसेच जखमींना लवकरात लवकर बरे वाटावे अशी सदिच्छा व्यक्त केली. भूतानने दिलेल्या पाठिंबा आणि ऐक्यभावाच्या संदेशाबद्दल भारतातर्फे कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

5. पंतप्रधान मोदींनी भूतानच्या 13व्या पंचवार्षिक योजनेला, ज्यामध्ये आर्थिक प्रोत्साहन कार्यक्रमाचा समावेश आहे, भारताच्या अढळ पाठिंब्याची पुष्टी केली, भूतानला त्याच्या प्रमुख विकास प्राधान्यक्रमांना साध्य करण्यासाठी आणि सर्व क्षेत्रांमध्ये शाश्वत विकासाला चालना देण्यासाठी सक्रियपणे मदत करण्याच्या भारताच्या वचनबद्धतेवर भर दिला. भूतानच्या 13व्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधीसाठी भूतानमध्ये विविध प्रकल्प राबविण्यासाठी आणि देशाच्या विकासातील त्यांच्या योगदानासाठी भूतानच्या बाजूने भारताच्या मदतीची प्रशंसा केली.

6. पंतप्रधान मोदींनी गेलेफू माइंडफुलनेस सिटीसाठी महामहिमांच्या दृष्टिकोनाच्या पूर्ततेसाठी भारत सरकारचा पूर्ण पाठिंबा असल्याचे सांगितले. गेलेफू येथे जाऊ इच्छिणारे गुंतवणूकदार आणि अभ्यागत

यांच्या सुरळीत गतिमानतेसाठी आसाममधील हातिसर येथे एक इमिग्रेशन चेक पोस्ट उभारण्याच्या निर्णयाची पंतप्रधान मोदी यांनी घोषणा केली. महामहिम यांनी ग्यालसुंग अकादमींच्या उभारणीसाठी भारत सरकारच्या पाठिंब्याची प्रशंसा केली.

7. महामहिम राजे आणि पंतप्रधान मोदी यांनी 11 नोव्हेंबर 2025 रोजी भगवान बुद्धाच्या पवित्र पिप्रहवा अवशेषांच्या उपस्थितीत 1020 मेगावॅट पुनत्सांगछू-II जलविद्युत प्रकल्पाचे संयुक्तपणे उद्घाटन केले. हा प्रकल्प जलविद्युत क्षेत्रात भूतान आणि भारत यांच्यातील मैत्री आणि अनुकरणीय सहकार्याचा पुरावा आहे. पुनत्सांगछू-II पासून भारतात वीज निर्यात सुरू होण्याचे त्यांनी स्वागत केले. मार्च 2024 च्या ऊर्जा भागीदारीवर संयुक्त दृष्टीकोनाच्या अंमलबजावणीबाबत उभय बाजूंनी समाधान व्यक्त केले.

8. 1200 मेगावॅट पुनत्सांगछू-I जलविद्युत प्रकल्पाच्या मुख्य बांधकाम संरचनेवर काम पुन्हा सुरू करण्याबाबत झालेल्या समजूतीचे नेत्यांनी स्वागत केले आणि प्रकल्पाच्या जलद पूर्णतेसाठी काम करण्यास सहमती दर्शविली. एकदा पूर्ण झाल्यानंतर, पुनत्सांगछू-I हा दोन्ही सरकारांनी संयुक्तपणे विकसित केलेला सर्वात मोठा जलविद्युत प्रकल्प असेल.

9. भूतानमधील जलविद्युत प्रकल्पांमध्ये भारतीय कंपन्यांच्या सक्रिय सहभागाचे त्यांनी स्वागत केले. भूतानमधील विद्युत प्रकल्पांना वित्तपुरवठा करण्यासाठी भारत सरकारतर्फे सवलतीच्या दरात ₹40 अब्ज कर्ज देण्याच्या घोषणेचे भूतानने कौतुक केले आहे.

10. दोन्ही बाजूंनी सीमापार संपर्कात सुधारणा करण्याचे आणि एकीकृत तपासणी पोस्ट स्थापित करण्यासह सीमेवरील पायाभूत सुविधा वाढविण्याचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी नोव्हेंबर 2024 मध्ये दरंगा येथे इमिग्रेशन चेक पोस्ट आणि मार्च 2025 मध्ये जोगीघोपा मधील अंतर्गत जलमार्ग टर्मिनल आणि मल्टीमॉडल लॉजिस्टिक्स पार्कच्या कार्यान्वयनाचे स्वागत केले. उभय बाजूंनी सीमापार रेल्वे मार्गांच्या स्थापनेसाठी (गेलेफू-कोकराझार आणि समत्से-बनारहाट) सप्टेंबर 2025 मध्ये झालेल्या सामंजस्य कराराचे (MoU) आणि त्यानंतर या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी झालेल्या प्रकल्प सुकाणू समितीच्या स्थापनेचे देखील स्वागत केले.

11. भूतानला आवश्यक वस्तू आणि खतांच्या अखंड पुरवठ्याची व्यवस्था संस्थागत करण्यासाठी भारत सरकारने उचललेल्या पावलांचे भूतानच्या बाजूने कौतुक करण्यात आले. नवीन व्यवस्थेत भारतातून खतांच्या पहिल्या खेपेच्या आगमनाचे उभय बाजूंनी स्वागत केले.

12. STEM, फिनटेक आणि अंतराळाच्या नवीन क्षेत्रांमध्ये वाढत्या सहकार्याबद्दल उभय बाजूंनी समाधान व्यक्त केले. त्यांनी UPI च्या फेज II वर काम करण्याचे स्वागत केले, जे भारताला भेट देणाऱ्या

भूतानच्या अभ्यागतांना QR कोड स्कॅन करून स्थानिक मोबाईल ॲप्लिकेशन्स वापरून देयक करण्यास सक्षम करेल. अंतराळ सहकार्यावरील संयुक्त कृती योजनेच्या अंमलबजावणीबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले. त्यांनी भूतानमधील STEM शिक्षण आणि आरोग्य सेवा सुधारण्यात भारतीय शिक्षक आणि परिचारिकांच्या अमूल्य योगदानाचीही दखल घेतली.

13. राजगीरमधील शाही भूतान मंदिराच्या अभिषेकाचे आणि भूतान मंदिर आणि अतिथीगृहाच्या बांधकामासाठी वाराणसीमध्ये जमीन देण्याच्या भारत सरकारच्या निर्णयाचे दोन्ही नेत्यांनी स्वागत केले.

14. या भेटीदरम्यान दोन्ही देशांमधील खालील सामंजस्य करारांवर स्वाक्षरी करण्यात आली:

a. ऊर्जा आणि नैसर्गिक संसाधने मंत्रालय, शाही भूतान सरकार (RGoB) आणि नवीन आणि अक्षय ऊर्जा मंत्रालय, भारत सरकार (GoI) यांच्यात अक्षय ऊर्जा क्षेत्रात सहकार्य करण्यासाठी सामंजस्य करार;

b. आरोग्य आणि औषधी क्षेत्रातील सहकार्यासाठी आरोग्य मंत्रालय, RGoB आणि आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय, GoI यांच्यात सामंजस्य करार ;

c. संस्थात्मक संबंध निर्माण करण्यासाठी PEMA सचिवालय आणि राष्ट्रीय मानसिक आरोग्य व न्यूरो विज्ञान संस्था, भारत सरकार यांच्यात सामंजस्य करार.

15. भूतान-भारत भागीदारी सर्व स्तरांवरील दृढ विश्वास, स्नेहपूर्ण मैत्री, परस्पर आदर आणि समज यावर आधारलेली आहे आणि दोन्ही देशांतील जनतेमधील सशक्त नाती तसेच आर्थिक आणि विकासात्मक सहकार्य यामुळे ती आणखी घट्ट होत आहेत. या भेटीने या दोन्ही देशांतील नियमित उच्च-स्तरीय विचारविनिमयाच्या परंपरेला आणखी बळकटी मिळाली आणि भविष्यात ते सुरू ठेवण्यास उभय बाजूंनी सहमती दर्शविली.

थिम्फू

12 नोव्हेंबर 2025